# घटक – १
# साहित्याचे स्वरूप

## १.० उद्दिष्टे

विद्यार्थी मित्रांनो, या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास

- पौर्वात्य, पाश्चात्त्य आणि आधुनिक साहित्य अभ्यासकांनी सांगितलेल्या साहित्याच्या व्याख्यांचा परिचय होईल.
- ललित आणि ललितेतर साहित्यातील भेद स्पष्ट होईल.
- ललित साहित्यातून व्यक्त होणाऱ्या अनुभवांच्या विशेषांचे आकलन होईल.
- साहित्याच्या विविध घटकांवरून साहित्याची व्याप्ती ध्यानी येईल.
- साहित्य वा काव्याचा आंतर-बाह्य स्वरूपाचे मूलभूत ज्ञान होईल.

## १.१ प्रास्ताविक

मानवाने आपल्या विकासाच्या वाटचालीत भाषा निर्माण केली. भाषेमुळे त्याचा जीवनव्यवहार सुकर झाला. भौतिक सोयीसुविधांबरोबर माणसाच्या मानसिक, भावनिक सुखाच्या गरजाही वाढू लागल्या. या सुखाच्या तृप्तीसाठी त्याने 'शब्दसृष्टी' निर्माण केली. तिलाच 'साहित्यसृष्टी' म्हटले जाते. ती निर्माण करणाऱ्यांना 'शब्दसृष्टीचे ईश्वर' म्हटले जाते. आपल्याकडे साहित्य निर्मितीची परंपरा अति प्राचीन आहे. हजारो वर्षांपूर्वी वाल्मिकी नावाच्या ऋषींनी 'रामायण' ही अनुष्टुभ छंदात केलेली शब्दरचना प्रारंभिक काव्य वा साहित्यकृती मानली जाते. इ. स. पूर्व २०० ते इ. स. २०० या काळात भरतमुनींनी लिहिलेल्या 'नाट्यशास्त्र' या ग्रंथापासून साहित्याच्या शास्त्रीय चर्चेला सुरुवात झालेली दिसते. साहित्य, काव्य, वाङ्मय या तीनही संज्ञा संस्कृतमध्ये समान अर्थानेच योजिल्या आहेत. भरतांनी 'काव्यात नाटक हा एक रमणीय प्रकार आहे' असे म्हणून 'गद्य, पद्य वा गद्यपद्य मिश्र रचना म्हणजे काव्य' अशी साहित्याची व्याप्ती स्पष्ट केलेली आहे. वाणीद्वारे व्यक्त होणारे ते वाङ्मय, कवीने निर्माण केलेली रचना ते काव्य आणि शब्द अर्थ यांचा यथावत सहभाव वा सार्थक शब्द ते साहित्य - याप्रमाणे वाङ्मय, काव्य व साहित्य शब्दांच्या व्युत्पत्तीवरून त्यांचे स्वरूप स्पष्ट होत नाही. यासाठी साहित्याच्या विविध व्यवच्छेदक घटकांचा विचार करावा लागतो.



Scanned with OKEN Scanner

चित्र, शिल्प, नृत्य, संगीत, गायन, वास्तू इत्यादी कलांप्रमाणे साहित्य ही सुद्धा एक कला आहे. शब्दांच्या माध्यमातून व्यक्त होणारी ती 'शब्दकला' आहे. कोणत्याही कलेतून सौंदर्याचा आविष्कार होत असतो. त्याप्रमाणे साहित्यातूनही सौंदर्याविष्कार होतो. म्हणूनच साहित्याला 'ललित साहित्य' म्हटले जाते. पौर्वात्यांनी काव्य वा साहित्य हे एक सजीव तत्त्व मानले व काव्याला 'काव्यकामिनी' असे संबोधले. या काव्यसुंदरीचे 'सौंदर्य' स्पष्ट करण्यासाठी काव्यशरीर व काव्याचा आत्मा असे दोन मुख्य घटक गृहीत धरले. या आधारेच संस्कृत काव्यशास्त्रज्ञांनी साहित्याच्या विविध व्याख्या केलेल्या आहेत. तसेच साहित्यातील शब्दाला व शब्दार्थाला त्यांनी काव्यशरीर तर रसाला काव्याचा आत्मा असल्याचे संबोधले. पाश्चात्त्यांनी 'सौंदर्य' हे प्राणतत्त्व मानून साहित्याच्या इतर घटकांसह त्याचे स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. अर्वाचीन अभ्यासकांनी साहित्याच्या स्वरूपाचा अधिक मूलगामी वेध घेण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. अशा विविध अंगांनी आपणाला प्रस्तुत विभागात साहित्याचे स्वरूप समजून घ्यावयाचे आहे.

## १.२ विषय विवेचन

साहित्य ही रसिकवाचकांना निर्भेळ आनंद देणारी श्रेष्ठ कला आहे. कलेचे स्वरूप पाऱ्यासारखे चकचकीत असते; ती एक प्रक्रिया असून ती पूर्ण होते तेव्हा निर्माण झालेल्या मूर्त रूपास कलाकृती म्हटले जाते. या अर्थानेच साहित्यकृती ही एक कलाकृतीच असते. अनेक कलाकृतींना अक्षरत्व लाभलेले असते. अशा अक्षर साहित्यकृतींच्या आधारेच साहित्याचे स्वरूप बऱ्याच अंशी प्रतीत होत असते. पौर्वात्य, पाश्चात्त्य व आधुनिक साहित्याभ्यासकांनी केलेल्या साहित्याच्या व्याख्यांमध्ये त्यामुळेच विविधता आलेली आहे. मात्र त्यांचे महत्त्व निश्चितपणे अनन्यसाधारण असेच आहे. कारण या सर्व व्याख्या साहित्याच्या स्वरूपावर प्रकाश टाकणाऱ्या आहेत. कोणत्याही साहित्यकृतीचे आकलन, अर्थनिर्णयन, आस्वादन आणि भाष्य करणे इत्यादींचा मार्ग त्यामुळे सुलभ-सोपा होऊ शकतो, यात मुळीच संदेह वाटत नाही. म्हणून 'साहित्याचे स्वरूप' हा विभाग संपूर्ण साहित्यशास्त्राच्या व समीक्षेच्या दृष्टीने पायाभूत आहे.

## १.३ साहित्याच्या व्याख्या

प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत साहित्याच्या प्रवाह अखंड प्रवाहित आहे. या हजारो वर्षांच्या प्रवासात साहित्याचे स्वरूपही सतत बदलत राहिलेले दिसते. पण त्याचे मूल्य कधीच कमी होत नाही. म्हणूनच रामायण, महाभारतासारखी आपली महाकाव्ये आजही संपूर्ण जगातील रसिक, साहित्यिक, विचारवंतांना आकर्षित करतात. अनेक साहित्यकृतींचा जन्म या महाकाव्यांमधून झालेला आहे. यावरून साहित्याचा विशाल, व्यापक, अवाका ध्यानी येतो. तसेच मानवी भावभावनांची असंख्य वेधक आणि जिवंत चित्रे, मनोभावविकारांचे अत्यंत तरल दर्शन, स्तिमित करणारे कल्पनाविश्व, जीवनसत्यांचे दर्शन घडविणारे विचारविश्व, अशा अनेक सूक्ष्मातिसूक्ष्म आणि विराट घटकांचा साहित्य अत्यंत कलात्मकतेने वेध घेत आले आहे. त्यामुळेच साहित्ययात्रा ही एक प्रकारची आनंदयात्राच असल्याचा अनुभव जाणत्यांना येत राहिला आहे.



Scanned with OKEN Scanner

यास्तवच जुन्यांपासून नव्यांपर्यंतची साहित्यचर्चा अभ्यासणे आवश्यक ठरते. त्यातील काही निवडक अभ्यासकांनी केलेल्या साहित्याच्या व्याख्या आपण पाहू.

### १.३.१ पौर्वात्यांच्या व्याख्या

प्राचीन म्हणजेच संस्कृत काव्यशास्त्रज्ञांना 'पौर्वात्य' असे संबोधले जाते. त्यांनी साहित्यशास्त्रावर विविध ग्रंथ लिहिले आहेत. त्या काळात त्यांनी साहित्य व्यवहाराकडे किती विलक्षण दृष्टीने पाहिले आहे, याचा काहीसा प्रत्यय त्यांनी केलेल्या साहित्याच्या व्याख्यांवरूनही येऊ शकतो. यामध्ये दण्डी, रुद्रट, भामह, वामन, मम्मट, क्षेमेंद्र, जगन्नाथ, कुंतल, आनंदवर्धन, विश्वनाथ आदी साहित्यशास्त्रज्ञांचा प्रामुख्याने निर्देश करावा लागतो. या ठिकाणी आपण भामह, आनंदवर्धन, मम्मट आणि विश्वनाथ यांनी केलेल्या व्याख्या समजून घेणार आहोत.

- **भामह –** ''शब्दार्थौ सहितौ काव्यम् ।'' काव्यालंकार, परि. १ का. १६

  (शब्द आणि अर्थ यांचे सहितत्त्व म्हणजेच काव्य होय.)

शब्द आणि अर्थ हे वेगवेगळे नसून ते एकरूप आहेत हे गृहित धरून भामहाने काव्याची व्याख्या केलेली आहे. ''कवीच्या प्रतिभा सामर्थ्याने अपूर्व रूप धारण करून प्रकट होणारा शब्द आणि त्यातून अभिव्यक्त होणारा चमत्कृतिपूर्ण अर्थ म्हणजेच शब्दार्थरूप काव्य होय.'' कोणत्याही काव्यरचनेतून आपणास कवीच्या प्रतिभेचा म्हणजेच चमत्कृतीपूर्णतेचा प्रत्यय येतो. उदा.

''जग जग माझ्या जीवा
असं जगणं तोलाचं
उच्च गगनांसारखं
धरित्रीच्या रे मोलाचं !''

बहिणाबाई चौधरींच्या या काव्यपंक्तीमधील प्रत्येक शब्दाचा व्यवहारातील वाच्यार्थ सहजपणे ध्यानी येतो, परंतु काव्यदृष्ट्या हीच रचना अत्यंत उदात्त, विशाल जीवनाशय व्यक्त करते. कवयित्रीच्या प्रतिभाप्रेरित चमत्कृतिपूर्णतेचा अनुभव जाणकार रसिकाला आल्याशिवाय राहात नाही. भामहाला याच प्रकारचे शब्दार्थांचे सहितत्त्व अपेक्षित आहे. काव्य वा साहित्य यालाच म्हणावयाचे काव्यातील शब्दार्थ कवीच्या अंतःकरणातील भाव व्यक्त करण्यास समर्थ बनलेले असून तशा अर्थाच्या भावछटा आणि ते शब्द यांचे परस्पर साहचर्य अभिन्नत्वानेच रसिकाला अननभूत अनुभूती देत असतात. तीच काव्यातील रस किंवा सौंदर्यप्रतीती म्हणता येते. 'सुंदरतेच्या सुमनांवरचे दव चुंबूनी घ्यावे । चैतन्याच्या गोड कोवळ्या उन्हांत हिंडावे ।' अशा रचनेतही शब्दार्थांचे सहितत्त्वच प्रतीत होऊन चमत्कृती साधली जाते. म्हणून भामहाची वरील व्याख्या साहित्याच्या स्वरूपावर महत्त्वाचे भाष्य करणारी आहे.



Scanned with OKEN Scanner

- **मम्मट –** ''तद्दोषौ शब्दार्थौ सगुणौ अनलंकृती पुनः क्वापि।'' (काव्यप्रकाश)

  (दोषरहित, गुणयुक्त, क्वचित स्फुट अलंकाररहित शब्दार्थ म्हणजे काव्य)

मम्मट हा काश्मिरी पंडित ध्वनिमताचा अनुयायी असूनही त्याने शब्दार्थांनाच महत्त्व दिलेले आहे. ज्या रचनेतील शब्दार्थ दोषरहित, गुणयुक्त (सगुण) व क्वचित स्फुट अलंकाररहित आहेत ते काव्य. निर्दोष शब्द कोणते ते ठरविता येत नाही. गुणयुक्त शब्दार्थ म्हणजे वामनाने सांगितलेले रीतिगुणयुक्त शब्दार्थ असावेत. प्रसाद, ओज, माधुर्य, अर्थव्यक्ती, सौकुमार्य, ओजस, सुश्लीष्टता, समता, कांती हे ते गुण होत. त्यामुळे मम्मटाच्या व्याख्येतील 'सगुणौ' हे काव्यलक्षण खूप महत्त्वाचे आहे. तसेच क्वचित अनलंकृत असले तरी बहुदा अलंकृत असे शब्दार्थ. या शब्दार्थांच्या समन्वयातून 'काव्य' निर्माण झालेले असते; असे मम्मटाला सूचित करावयाचे आहे. त्याने येथे ध्वनी अथवा रसाचा उल्लेख केलेला नाही. तरीसुद्धा त्याला शब्दार्थापेक्षा ध्वनीचे आणि काव्यात रसाचे अधिक महत्त्व मान्य होते.

मम्मटाच्या व्याख्येतील लक्षणांचा व्यापक अर्थाने विचार केल्यास साहित्य (१) शब्दप्रधान (वेदादी), (२) अर्थतात्पर्य प्रधान (इतिहास, पुराण) आणि (३) काव्यशब्दअर्थगौण प्रधान (काव्यव्यापारातून होणारे रसप्रधान) असे तीन प्रकारचे असते. शब्दार्थ जेव्हा अभिधा, लक्षणा, आणि व्यंजना या तीन शक्तींनी युक्त रसोत्कर्ष साधणाऱ्या गुणांनी मंडित होतात आणि अर्थाचे विभावन करणाऱ्या, त्याला आस्वाद्य बनवणाऱ्या अलंकारांनी संस्कारित होतात तेव्हा ते खरे काव्य असते. तथापि, मम्मटाच्या व्याख्येतून काव्यस्वरूपाचा स्पष्टपणे बोध होत नाही. कारण साहित्यिक हा कितीही प्रतिभावंत असला तरी त्याच्या साहित्यकृतीत एखादा बारीक-सारीक दोष राहून गेलेलाच असतो.

- **आनंदवर्धन –** 'काव्यस्य आत्मा ध्वनिः। (ध्वन्यालोक इ.स. ८५०)

  (ध्वनी हाच काव्याचा आत्मा आहे.)

आनंदवर्धनाने ध्वनिसिद्धांत मांडून भारतीय साहित्यविचारात क्रांतीच घडवून आणली. भरतांचा रसनिष्पत्तीचा सिद्धांत आनंदवर्धनाला मान्यच होता. लौकिक सुखदुःखात्मक अनुभूतींना काव्यनाटकात रसरूप कसे प्राप्त होते, याचे समाधानकारक उत्तर आनंदवर्धनाच्या काळापर्यंत मिळालेले नव्हते. कविव्यापारात शब्दांच्या वाच्यार्थाला महत्त्व नसून शब्दांची 'अमुख्यवृत्तीच' मूळ असते हे उद्भट या काव्यशास्त्रज्ञाने ओळखले होते. या 'अमुख्यवृत्तीच्या' विवरणातून ध्वनिसिद्धांत निर्माण झाला.

सूचित अर्थ म्हणजे ध्वनी. कवी आपल्या मनातील व्यंग्यार्थ व्यक्त करण्यासाठी वक्रोक्ती, गुण, अलंकार. या सर्वांची योजना करतो. काव्यातील व्यंग्यार्थ हाच ध्वन्यार्थ होय. काव्यामध्ये ध्वन्यार्थाला महत्त्व असते. आनंदवर्धनाच्या मते 'रस' हे प्रत्यक्ष तत्त्व नसून शब्दार्थादी घटकांच्या द्वारे ध्वनित होणारे तत्त्व आहे. यालाच तो रसध्वनी म्हणतो. कविव्यापारातून रसप्रतीती येते ती ध्वन्यार्थामुळेच. महाकवींच्या काव्यात ध्वन्यार्थच असतो. त्यांच्या काव्यातील वाच्यार्थ हे काव्यशरीर तर ध्वन्यार्थ हा काव्याचा आत्मा असे ध्वनिकारांनी सुचविले आहे. ध्वन्यार्थ हा वाच्यार्थापेक्षा वेगळा तर काही वेळेला तो विरुद्धही असतो.



Scanned with OKEN Scanner

ध्वन्यार्थाचे स्वरूप उदाहरणाद्वारे स्पष्ट करता येते. 'सूर्य अस्तास गेला' या वाक्याचा वाच्यार्थ 'सूर्य थोड्याच अवधीत मावळणार आहे' असा असून तो सृष्टीव्यापाराची एक घटना आहे. मात्र संदर्भानुसार या वाक्याचा अर्थ बदलत जातो. म्हणजे एखाद्या गुराख्यास 'आता गुरे घरी घेऊन जायला पाहिजे'. एखाद्या शेतकऱ्यास 'शेतातील काम बंद करून घरी जावे वाटेल.' एखाद्या चोरास 'आता आपला दिवस सुरू झाला.' याची जाणवी होईल. नवविवाहितेला 'पतीच्या स्वागताची तयारी करायला हवी' असा बोध होईल. तर एखाद्या पुजाऱ्यास 'आता संध्यापूजा केली पाहिजे' याप्रमाणे वरील एकाच वाक्याचे व्यक्ती व संदर्भानुरूप वेगवेगळे अर्थ सूचित होतील. ध्वन्यार्थ अशा विविध आणि व्यापक अर्थ व्यक्त करणारा असतो.

साहित्यात असा ध्वन्यार्थ अभिव्यक्त करण्याचे सामर्थ्य असते. ते गद्यपद्य रचनेतही असते. उदा. 'माणसाने पुढ्यातले ताट द्यावे पण बसायचा पाट देऊ नये' हे 'नटसम्राट' नाटकातील वाक्य असो किंवा 'दुरितांचे तिमीर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो । जो जे वांछिल तो ते लाहो । प्राणिजात ।।'' ही ज्ञानदेवांची 'पसायदान' मधील प्रसिद्ध ओवी असो किंवा 'काय भुललासी वरलीया रंगा । ऊस डोंगा परि रस नोहे डोंगा।'' हा चोखोबांचा अभंग असो, अशा साहित्य रचनांना आजही अर्थाची नवनवी परिमाणे प्राप्त होताना दिसतात. रसिकांच्या जाणिवेच्या आणि आकलनक्षमतेच्या सामर्थ्याप्रमाणे त्यांना साहित्यातील ध्वन्यार्थामुळेच रसप्रतीती येत असते म्हणून 'ध्वनी हाच काव्याचा आत्मा होय' हे आनंदवर्धनाने काव्यस्वरूपावर केलेले भाष्य खूप महत्त्वाचे मानले जाते.

- **विश्वनाथ –** 'वाक्यं रसात्मकं काव्यम् । (साहित्यदर्पण)

  (रसयुक्त वाक्य म्हणजे काव्य)

इ.स. १३०० ते १३५० या काळात विश्वनाथ या काव्यशास्त्रज्ञाने 'साहित्यदर्पण' हा महत्त्वाचा ग्रंथ लिहिला. त्यामध्ये त्याने 'रसयुक्त वाक्य म्हणजे काव्य' ही सर्वमान्य झालेली व्याख्या दिलेली आहे. रससूत्राचे महत्त्व विचारात घेऊन विश्वनाथाने रसाला काव्याचे आत्मपद दिले. काव्यातील रस म्हणजे भावना होय. काव्यास्वादात रसिकाच्या ठिकाणी भावनाजागृती होऊन त्या प्रबळ बनतात. शब्द, वाक्य किंवा पदातून असा भावात्मक अर्थ प्रकट होत असेल व रसिकांच्या भावनांना सहजगत्या आवाहन केले जात असेल तर ते 'काव्य' होय, असे विश्वनाथाला वरील व्याख्येतून सूचित करावयाचे आहे. शास्त्रीय लेखनात रस किंवा भावपरता मुळीच नसते. सर्व ललित वाङ्मय भावात्म म्हणजे रसात्मक असते. म्हणूनच आनंदवर्धन व अभिनवगुप्त यांनी 'रस एव वस्तुतः आत्मा' म्हणजे रस हाच वस्तुतः आत्मा आहे, असे म्हटले आहे.

भरतमुनींनी 'नाट्यशास्त्र' या ग्रंथात शृंगार, वीर, करुण, हास्य, रौद्र, भयानक, अद्‌भूत आणि बीभत्स असे आठ रस व त्यांचे अनुक्रमे रती, उत्साह, शोक, हास, क्रोध, भय, विस्मय, जुगुप्सा (कीळस) असे आठ स्थायीभाव सांगितले आहेत. या रसांमध्ये नंतरच्या काळात शांत व भक्ती रसांचीही भर पडलेली आहे. साहित्यकृतीतून यापैकी कोणत्या ना कोणत्या तरी रसांचे साहित्यिकाने आपल्या प्रतिभाबलाने वर्णन केलेले असते. त्यामुळेच त्या त्या रसांप्रमाणे रसिकांच्या भावनांना आवाहन होत असे. विश्वनाथाच्या व्याख्येचा



Scanned with OKEN Scanner

येथे मुख्यार्थ घेऊन चालत नाही. कारण साहित्यकृतीतील प्रत्येक वाक्य रसात्मक असते; तर त्यात कोणता रस आहे, हे एका वाक्यावरून कळत नाही. त्यासाठी साहित्यकृतीच्या समग्र आस्वादाची आवश्यकता असते किंवा कवितेतील काही पंक्ती, कथा, कादंबरी, नाटकादी कृतींमधील एखादी घटना, एखादा प्रसंग वा दृश्य यातील आकलन व आस्वादन व्हावे लागते. रसात्मकतेचा प्रत्यय घडविणाऱ्या रचनांची काही उदाहरणे पाहू -

''नको देवराया अंत आता पाहू
प्राण हा सर्वथा जाऊ पाहे।'
हरिणीचे पाडस व्याघ्रे धरियले
मजलागी जाहले तैसे देवा।।''

संत कान्होपात्रेच्या या काव्यातून करुण व भक्ती रसांचा उत्कट प्रत्यय येतो. कारण येथे शब्दार्थांतून एक प्रकारचे भावनाचित्रच साकारलेले आहे. शब्दांची ही रचना इतकी सजीव असते की, त्यांच्या प्रत्येक घटका-घटकांमधून विलसणारे चैतन्य कधी रसनिर्मिती करून जाते ते कळत नाही.

''मालवून टाक दीप चेतवून अंग अंग
राजसा, किती दिसांत लाभला निवांत संग
त्या तिथे फुलांफुलांत पेंगते अजून रात
हाय! तू करू नकोस एवढ्यात स्वप्नभंग....''

कवी सुरेश भट यांच्या या कवितेतील श्रृंगार रसाचा रसिकांना तितक्याच तीव्रतेने उत्कट प्रत्यय येत राहतो. पोवाडा, क्रांती गीते, देशभक्तीपर स्फूर्ती गीतांतून वीर, करुणादी रसांचा आविष्कार होत असतो. भावनेप्रमाणेच कल्पनाविलासातून तसेच विचारप्रधान साहित्यातूनही रसिकांना जो प्रत्यय येऊन त्याच्या चित्तात, मनात एक विशिष्ट प्रकारची सुखानुकूल स्वरूपाची संवेदना निर्माण होते ती सुद्धा 'रसप्रतीती'च असल्याने पौर्वात्यांनी गृहित धरले आहे. त्यामुळे 'रस' हा अशा व्यापक अर्थाने काव्याचा आत्मा ठरतो.

### १.३.२ पाश्चात्त्यांच्या व्याख्या

पाश्चात्त्य काव्यशास्त्रज्ञांनी 'सौंदर्य' हेच काव्याचे वा ललितकलांचे प्राणतत्त्व मानून काव्याच्या व्याख्या केलेल्या आहेत. 'भावनात्मक अनुभूतीचा रमणीय आविष्कार म्हणजे काव्य' हे त्यांना मान्य आहे; पण काव्यात भावनेबरोबरच भावना आविष्कारालाच (Expression) खरे महत्त्व आहे, यावर पाश्चात्त्यांनी भर दिला आहे. काव्यातील भावनाविष्काराचे महत्त्व जाणून डी. क्विन्सी या अभ्यासकाने भावनेला 'Power of Literature' असे म्हटले आहे. पाश्चात्त्यांनी 'Emotional Element' (भावना अंग) हा घटक मुख्य मानला असला तरी त्यांच्या मते, ''काव्यात भावनेचे अगर वस्तूचे वास्तव चित्रण नसते. विशिष्ट भावजागृती करणाऱ्या वस्तूच्या अथवा घटनेच्या दर्शनाने कवीच्या अंतःसृष्टीत जी प्रतिमा साकार होते, त्याच्या कल्पनात्मक प्रतिक्रियेला जो



Scanned with OKEN Scanner

सौंदर्यपूर्ण आकार येतो त्याची अभिव्यक्ती म्हणजे काव्य'' – यास अनुसरून पाश्चात्त्य काव्यशास्त्रज्ञांनी साहित्याच्या व्याख्या केलेल्या आहेत. त्यामध्ये वर्डसवर्थ, कोर्टहोप, मॅथ्यू अर्नोल्ड आणि कार्लाइल यांच्या व्याख्याचा आढावा घेऊ.

- **वर्डस्वर्थ** – "The spontaneous overflow of powerful feelings." (उत्कट भावनेचा उत्स्फूर्त उद्रेक म्हणजे काव्य).

वर्डस्वर्थने या व्याख्येत भावनेला एकमेव स्थान दिलेले आले. ज्याला आपण अक्षर वाङ्मय म्हणतो ते भावनेने ओथंबलेले असते. तसेच अंतःकरण फुटल्याशिवाय अस्सल काव्य निर्माण होत नाही असेही काही अभ्यासक म्हणतात. कवितेला तर कुणी आत्माविष्कार वा आत्म्याचा हुंकार म्हणतात. रामायणातील पहिला श्लोक ''मा निषाद ! प्रतिष्ठां त्वं गमः शाश्वती समः। यत्क्रौंचमिथुनात एकंवधिः काममोहितम्।'' हा महाकवी वाल्मिकींच्या मुखातून एका करुण प्रसंगदर्शनाने सहजस्फूर्त उद्गार बाहेर पडला आहे. या श्लोकाचा अर्थ, 'हे (नको) निषादा, ज्याअर्थी क्रौंच (पक्ष्याच्या) जोडप्यापैकी काममोहीत झालेल्या एका निरपराध पक्ष्याचा तू अकारण वध केला आहेस त्याअर्थी तुला ह्या जगात कधीही प्रतिष्ठा मिळणार नाही.'' असा नेहमीसारखा असला तरी मूळ श्लोक हा अभिनव अशा वक्रोक्तिपूर्ण अनुष्टुभ नावाच्या छंदामध्ये व्यक्त झाला आहे. त्यातूनच पुढे 'रामायण' या महाकाव्याची रचना झाली. या अर्थाने 'रामायण' म्हणजे 'उत्कट भावनेचा उत्स्फूर्त उद्रेक ठरावे.

संतकवी तुकाराम महाराज एका अभंगात म्हणतात,

''न लगे चंदना पुसावा परिमळ। वनस्पतीमेळ हाकारूनि
अंतरिचे धावे स्वभावे बाहेरी। धरिताही परि आवरेना।।''

'कविता'' या साहित्यप्रकाराचा आविष्कार प्रामुख्याने उत्कट भावनेचा सहजस्फूर्त उद्रेक असतो, असे अनेक कवींच्या अनुभवांवरून प्रत्ययास येते. लौकिकदृष्ट्या निरक्षर असणाऱ्या बहिणाबाई चौधरी यांच्या कविता अशाच सहजस्फूर्त आहेत. स्वतः बहिणाबाई त्याबद्दल म्हणतात,

''अरे घरोटा घरोटा
तुझ्यातून पडे पिठी
तसं माझं गाणं
पोटातून येतं ओठी''

भावनेच्या आवेगातून कविता जन्माला येते याबद्दल आक्षेप घेता येत नाही. गोविंदाग्रजांची 'राजहंस माझा निजला' ही दीर्घ कविताही अशाच सहजस्फूर्त भावोद्रेकातून निर्माण झाल्याचे सर्वश्रुत आहे. कवी व साहित्यिकाची ही भावोत्कट अवस्था कथा, कादंबरी, नाटक, आत्मचरित्र आदी निर्मिती करीत असताना सातत्याने टिकून असतेच असे मात्र म्हणता येणार नाही. तथापि, वर्डस्वर्थने केलेली काव्याची व्याख्या काव्याच्या महत्त्वपूर्ण अंगावर प्रकाश टाकणारी आहे, हे निश्चितपणे म्हणता येते.



Scanned with OKEN Scanner

● **कोर्टहॉप** : "The art of producing by the just expression of imaginative thought and feeling in metrical language."

(कल्पनानिष्ठ विचार, भावना ज्या लयबद्ध भाषेतून तात्काळ व्यक्त होतात अशी जी आनंदनिर्मित कला तिला काव्य असे म्हणावयाचे.)

कोर्टहॉपने कल्पना, विचार आणि भावना या तीन घटकांनाही या व्याख्येत महत्त्व दिलेले आहे. पाश्चात्त्यांनी मुळातच बुद्धी अंग (Intellectual Element), कल्पना अंग (Imaginative Element) आणि भावना अंग (Emotional Element) तसेच लयबद्धता ही चार तत्त्वे काव्याची मुख्य अंगे सांगितली आहेत.

कल्पनेला स्वैर होऊ न देणे हा बुद्धीचा एक भाग असतो. तसेच भावनेला व कल्पनेला विचाराचा आधार असणे काव्यात आवश्यक असते. अन्यथा काव्य स्वैर, अद्‌भूत, अवास्तव वा अतिरंजित होईल. म्हणून साहित्यात विचार (Thought) महत्त्वाचा असतो. संत साहित्यातून असे अनेक विचार व्यक्त झालेले दिसतात. मात्र हे विचार अशा कलात्मकतेने आलेले असतात की त्यामुळे काव्य वा साहित्य शास्त्रीय वाङ्मयाप्रमाणे रुक्ष तत्त्वजड किंवा निरस होत नाही. उदा. 'कुसुमाग्रज, साने गुरूजी, विंदा करंदीकर, मुक्तिबोध, नारायण सुर्वे, केशवसुत, बहिणाबाई चौधरी, इंदिरा संत, संजिवनी मराठे इत्यादी अनेक कवींच्या सामाजिक कवितांमधून आपणास याचा प्रत्यय येत असतो. त्यातील विचारप्रधानताही रसिकांना भावणारी असते.

साहित्यात विचार, अनुभव किंवा भावना ह्या कवी, साहित्यिक कल्पनेच्या साह्याने आविष्कृत करीत असतो. किंबहुना कल्पनेच्या आवरणाशिवाय नेमकेपणाने व्यक्त होणे अशक्य असते. काव्यातील कल्पनावैभव अनेक रचनांमधून दिसते. उदा.

''शांताचेया घरा । अद्‌भुतू आला पाहुणेरा।
एरां रसांही जाला। पांतिकरा मानु।।'' – ज्ञानेश्वर

शांताचे (शांत रसाचे) घर, अद्‌भूत रसाचे पाहुणा म्हणून येणे, रसांची पंगत ह्या बाबी ज्ञानेश्वरांच्या अपूर्व कल्पनासृष्टीचे द्योतक आहेत. प्रत्येक कवी-लेखकाची जी प्रतीक-प्रतिमाने यांची साहित्य-कृतीतील योजना ही त्यांची कल्पनासृष्टीच असते. केबल, रस्किन, हॅजलिट, जॉन्सन आदी काव्यज्ञांनी 'कल्पना' हे काव्याचे अंग मानले आहे. भावनेबरोबरच कल्पनेला महत्त्व देऊन कोर्टहॉपने काव्यस्वरूपाची व्याप्ती अधिक स्पष्ट केली आहे.

कवी-लेखकाला 'भावना' व्यक्त करावयाच्या असतात. या भावनाच काव्याच्या केंद्रस्थानी असल्याचे कोर्टहॉपने वरील व्याख्येत म्हटले आहे. तर त्या व्यक्त करण्यासाठी कवी विचार-कल्पनांची त्यांना कलात्मक जोड देत असतो. विशेष म्हणजे या साऱ्यांची अभिव्यक्ती कवी लयबद्ध भाषेतून करतो; त्यामुळेच रसिकाला काव्यानंदप्राप्ती होते. अशी जी आनंदनिर्मित कला तिला 'काव्य' म्हणावयाचे – ही कोर्टहॉपची व्याख्या यथार्थ वाटते. ती वर्डस्वर्थच्या व्याख्येपेक्षा अधिक व्यापक आहे.



Scanned with OKEN Scanner

● **मॅथ्यू अर्नोल्ड** – (Poetry is the Criticism of Life)

१. ''काव्य म्हणजे जीवनभाष्य''.

२. ''मानवी शब्दशक्तीचा अत्यंत निर्दोष आणि आल्हाददायक उद्‌गार म्हणजे काव्य.'' (The most delightful and perfect form of utterance that human word can reach.)

मॅथ्यू अर्नोल्डने काव्याच्या वरील दोन व्याख्या केलेल्या आहेत. यातून त्याने काव्याच्या आंतरबाह्य स्वरूपावर तसेच काव्याचा रसिकमनांवर होणारा परिणाम यावर प्रकाश टाकलेला आहे. साहित्यिक हा सुद्धा समाजाचा घटक असतो. जीवनाविषयी इतरांप्रमाणे त्यालाही खूप कुतूहल असते. आपल्या साहित्यकृतीतून तो आपले जीवनविषयक अनुभव, जाणिवा, कल्पना, अपेक्षा इत्यादींबद्दल काही ना काही भाष्यच करीत असतो. म्हणजेच प्रत्येक साहित्यकृती ही एक जीवनभाष्यच असते. रामायण, महाभारतासारख्या महाकाव्यांतून मानवी जीवनाचे विशाल, विराट दर्शन घडते. त्याप्रमाणे 'मानसा-मानसा कधी व्हशील मानूस' यासारख्या एकाच काव्यपंक्तीतूनही जीवनभाष्यच व्यक्त झाले आहे. त्यातून सौंदर्यही व्यक्त होत असते. यासाठीच अर्नोल्डने 'मानवी शब्दशक्तीचा अत्यंत निर्दोष आणि आल्हाददायक उद्‌गार म्हणजे काव्य' ही दुसरी व्याख्याही केलेली आहे.

प्रत्येक कविता किंवा साहित्यकृती ही एक स्वतंत्र सौंदर्य शिल्प असते. प्रतिभावंताकडून तिचा आविष्कार झालेला असल्यामुळेच ती काव्य वा साहित्यकृती निर्दोष आल्हाददायक असा उद्‌गार असते. शब्दसामर्थ्यामुळेच कवीचा वेगळेपणा सिद्ध होतो. म्हणूनच जिला आपण काव्यकृती म्हणतो तिला तिचे स्वतःचे सौंदर्य असतेच. वसंत बापटांच्या 'बाभूळझाड' या कवितेतील शब्द कसे निर्दोष वाटतात ते पहा. उदा.ः

''अस्सल लाकूड, भक्कम गाठ
ताठर कणा, टणक पाठ
वारा खात, गारा खात
बाभूळझाड उभेच आहे.''

रसिकाला ही रचना आल्हादायक वाटतेच. ही कविता जीवनभाष्य तर करतेच पण रसिकला सौंदर्य वा रसप्रतीतीही देते. यादृष्टीने काव्याकडे पाहिले तर मॅथ्यू अर्नोल्डच्या वरील दोनही व्याख्या आपणाला काव्यस्वरूपाचे आणि काव्यसामर्थ्याचेही दर्शन घडविणाऱ्या आहेत, असे म्हणता येते.

● **कार्लाईल** – 'Poetry is musical thought' **(संगीतमय विचार म्हणजे काव्य)**

'रमणीय अर्थाचे प्रतिपादन करणारे शब्द म्हणजे काव्य' अशी पौर्वात्य काव्यशास्त्रज्ञ जगन्नाथ याने काव्याची व्याख्या केलेली आहे. त्या व्याख्येशी समांतर असणारी व्याख्या कार्लाईल या पाश्चात्त्याने केलेली आहे. 'संगीतमय' या शब्दाशी लयबद्धता, नादमयता, छंदबद्धता याबरोबरच ताल, सूर या संवेदनाही सजग



Scanned with OKEN Scanner

होतात. आपल्याकडील संत कवींची, शाहीरांची आणि अनिलपूर्व कविता छंदवृत्तात्मक असल्यामुळे लयबद्ध आणि गेय आहे. विशेषतः पद्यरचना विशिष्ट अशा लयबद्धतेने आविष्कृत झालेल्या असतात. कवितेला स्वतःची अशी एक लय असते, नाद असतो आणि तिच्यामध्ये एक प्रकारची संगीतमयताही असते. संगीत ही सुद्धा एक कला असून तिच्यात रसिकाला वेधून घेण्याचे, तल्लीन व्हायला लावण्याचे सामर्थ्य असते. त्याच अर्थाने साहित्यही रसिकांना असा अनुभव देत असते.

'लीळाचरित्र' हा महानुभावीय लेखक म्हाइंभट याचा चरित्रग्रंथ पण त्याचा आस्वाद घेताना किंवा मध्ययुगातील 'भाऊसाहेबांची बखर', 'सभासदाची बखर', 'पाणिपतची बखर' इत्यादी गद्य साहित्याचा आस्वाद घेताना रसिक वाचक त्यामध्ये तल्लीन होऊन जातो. अनेक कथा, कादंबऱ्या, नाट्यकृती व ललित गद्यकृती रसिकांना वेधून घेऊन त्यांना झपाटून टाकतात. यामागे साहित्यातील असे संगीतमय विचारच कारणीभूत असतात. म्हणून कार्लाईलच्या वरील व्याख्येत खूप सूचक अर्थ असल्याचे प्रकर्षाने जाणवते. परंतु त्यामुळे काव्यस्वरूपाचा शोध पूर्ण होत नाही.

### १.३.३ आधुनिक अभ्यासकांच्या व्याख्या

आधुनिक साहित्य समीक्षकांनी साहित्याचे ललित साहित्य आणि ललितेतर साहित्य असे दोन ठळक भेद केलेले आहेत. त्यांनी आपल्या व्याख्यांमधून ललित साहित्याचे स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. ''प्रतिभाशक्तीने प्रेरित केलेले व आनंद देणारे लेखन म्हणजे ललित साहित्य होय.' असे प्रा. रा. ग. जाधव यांनी म्हटले यावरून या प्रकारचे लेखन एखाद्या व्यक्तीने केलेले असून त्या निर्मितीमध्ये प्रतिभेचा वापर हवा तसेच त्यातून सर्वांना आनंद मिळाला पाहिजेच, अशा लक्षणांनी युक्त असणारे ते ललित साहित्य होय. ललित म्हणजे सुंदर यावरून सौंदर्यात्मक साहित्य ते ललित साहित्य होय. ललित म्हणजे सुंदर यावरून सौंदर्यात्मक साहित्य ते ललित साहित्य होय. ललित साहित्यात कथा, कादंबरी, काव्य, नाटक आदी समग्र साहित्यप्रकारांचा अंतर्भाव होतो. याउट ललितेतर साहित्यात इतिहास, भूगोलादी सर्व सामाजिक शास्त्रे, विज्ञान, ज्योतिष, पाककृती इत्यादी भौतिक विषयांवरील लेखनाचा समावेश होतो.

ललित साहित्य हे व्यक्तिनिष्ठ असून त्यामध्ये लालित्याला, सौंदर्याला महत्त्व असते. तर शास्त्रीय वाङ्मय हे वस्तुनिष्ठ, बुद्धिनिष्ठ व तर्काधिष्ठित असते. यामध्ये ज्ञानाला महत्त्व असते. याप्रमाणे आधुनिक मराठी साहित्य समीक्षकांनी पौर्वात्य व पाश्चात्त्य काव्य घटकांचा आधार घेऊन आणखी काही काव्यतत्त्वांचा निर्देश करणाऱ्या व्याख्या देऊन साहित्याच्या स्वरूपाची कक्षा विस्तृत करण्याचा प्रयत्न केलेला आहे. यामध्ये आपण विनोबा भावे, अ. वा. कुलकर्णी, गंगाधर गाडगीळ आणि वि. ना. ढवळे यांनी केलेल्या साहित्याच्या व्याख्यांचा विचार करणार आहोत.



Scanned with OKEN Scanner

● **विनोबा भावे –** 'साहित्य म्हणजे अहिंसा''.

(विनोबांची साहित्यष्टी – संपादक – अ. ना. देशपांडे, परधाम प्रकाशन, पवनार, आवृत्ती दुसरी १ फेब्रुवारी, १९७५, पृष्ठ क्र. २९)

विनोबांनी साहित्याची खूपच सूचक व्याख्या केलेली आहे. त्यांच्या मते, साहित्य ही स्वयंभू वस्तू असून हेतू ठेवून जे साधत नाही ते येथे हेतू न ठेवता साधते. म्हणजेच साहित्याची निर्मिती निर्हेतूक असते. यासाठी विनोबांनी 'रामायणाचा' संदर्भ दिलेला आहे. तो असा ''क्रौंच मिथुनाचा वियोग वाल्मिकींना सहन झाला नाही; त्यामुळे त्यांना शोक झाला आणि त्यांच्या वाणीतून सहज श्लोक बाहेर पडला. त्यांचा शोक हाच श्लोकाकार बनला. पुढे नारदांनी सांगितल्यावरून वाल्मिकींकडून अनुष्टुभ छंदात रामायण गाईले गेले. श्रम हा शम बनून जावा अशी साहित्यामध्ये शक्ती आहे. श्रमाशिवाय कोणतीही वस्तू निर्माण होत नाही. मनुष्य श्रमाने थकल्यावर विश्रांती घेतो व विश्रांती घेतल्यानंतर श्रम करतो. यावरून श्रम आणि विश्रांती दोन्ही एकाच वेळी लाभतात. चोवीसही तास काम आणि चोवीसही तास आराम, ही आहे साहित्याची खुबी. साहित्याचे चित्तावर ओझे होत नाही. (विनोबांची साहित्यदृष्टी, पृ. ३२)

साहित्य हे ऐकणाऱ्यांवर आक्रमण करीत नाही. म्हणजे शोकात्म वा सुखात्म किंवा संमिश्र असे कोणतेही साहित्य रसिकाला आनंदानुभूतीच देत राहते. अशा व्यापक आणि सूचक अर्थाने विनोबा भावे यांनी 'साहित्य म्हणजे अहिंसा' अशी आगळीवेगळी व्याख्या केलेली आहे.

**अ. वा. कुलकर्णी**

''साहित्य, संगीत, शिल्प, वास्तू, चित्र इत्यादी सर्वच ललित कलाविष्कार म्हणजे कलावंताने आपल्या अनुभवांची प्रतिभा कल्पना यांच्या आधारे साधलेली पुनर्निर्मिती होय.'' (साहित्यविचार – अ. वा. कुलकर्णी, द्वितीयावृत्ती, १५ जुलै, १९९७, पृष्ठ क्रमांक १९)

अ. वा. कुलकर्णी यांनी 'साहित्य' ही कला मानून साहित्यिकाला कलावंत म्हटले आहे. अशा कलावंताने आपल्या अनुभवांची प्रतिभा व कल्पना यांच्या आधारे साधलेली पुनर्निर्मिती म्हणजे साहित्य, असे म्हटले आहे. यामध्ये बेरचसे तथ्य आहे. कारण प्रत्येक व्यक्तीजवळ अनुभवांचा कमी-अधिक साठा हा असतोच. पण प्रत्येकाजवळ त्या अनुभवांची शब्दांच्या माध्यमातून पुनर्निर्मिती करणारी प्रतिभा व कल्पना शक्ती असत नाही. ती शक्ती फक्त कलावंत, साहित्यिकांकडेच असते. म्हणून साहित्याला 'प्रतिसृष्टी' संबोधले जाते. साहित्यिक आपल्या अनुभवांना प्रतिभा व कल्पना यांच्या साहाय्याने पुनः नवे जिवंतपण देत असतो. त्यामुळेच प्रत्येक साहित्यकृती नित्यनूतनच असते. अ. वा. कुलकर्णी यांनी साहित्याच्या निर्मिती प्रक्रियेवरही या व्याख्येत भाष्य केलेले आहे. तर 'अनुभव' हेच साहित्याच्या केंद्रस्थानी असल्याचे स्पष्ट केले आहे. म्हणून ही व्याख्या साहित्याचे स्वरूप स्पष्ट करण्याच्या दृष्टीने महत्त्वाची वाटते.



Scanned with OKEN Scanner

● **गंगाधर गाडगीळ**

''साहित्य म्हणजे अनुभवाची अभिव्यक्ती''

(खडक आणि पाणी – गंगाधर गाडगीळ, पॉप्युलर बुक डेपो, मुंबई, प्रकाशक ग. रा. भटकळ, प्रथम मुद्रण १९६०, पृष्ठ क्र. ८)

गंगाधर गाडगीळांची ही व्याख्या खूप सूचक अशीच आहे. साहित्यात प्रामुख्याने नव्हे तर सर्वार्थाने साहित्यिकाचे अनुभवविश्वच आविष्कृत किंवा प्रतिबिंबित झालेले असते. या अनुभवांमध्ये भावना, कल्पना, विचार, संवेदना, जाणिवा, नेणिवा, जीवनातील घटना प्रसंग, व्यक्ती, पर्यावरण असे अनेकविध घटक एकत्रित झालेले असतात. अशा अनुभवांना अभिव्यक्त करताना साहित्यिक आपल्या प्रतिभा सामर्थ्याने कलात्मकतेचे परिमाण देत असतो. त्यामुळे त्यामध्ये सौंदर्य, लालित्य, चमत्कृती निर्माण होते. अशा रचनेला वा निर्मितीला साहित्य म्हटले जाते – असा अन्वयार्थ लावून मगच गाडगीळांच्या वरील व्याख्येचे महत्त्व ध्यानी येत राहाते. कोणत्याही ललित साहित्यकृतीला या व्याख्येतील निकष आपण लावू शकतो. म्हणजेच साहित्य हे अनुभवांची अभिव्यक्ती असते, याची यथार्थता ध्यानी येते.

● **वि. ना. ढवळे**

''मूळ लेखनाचा जो तात्कालिक संदर्भ असेल तो त्या लेखकाचे स्फूर्तिस्थान असलेले सर्व प्रसंग, घटना, व्यक्ती वगैरे विशेषतः विचारात न घेतासुद्धा जे लेखन वाचावेसे वाटते ते वाङ्मय!''

साहित्याच्या स्वरूपावर भाष्य करणारी अगदी सोपी व्याख्या वि. ना. ढवळे यांनी केलेली आहे. वाचावेसे वाटते ते वाङ्मय हे पूर्ण सत्यच आहे. पण या व्याख्येतील पूर्वार्धही महत्त्वाचा आहे. कारण त्यामध्ये लेखकाचा निर्देश आलेला आहे. त्यामुळे ही व्याख्या ललित साहित्याचाच वेध घेणारी आहे हे स्पष्ट होते. रसिक वाचकांना वाचावे वाटणारे लेखन अर्थातच वर चर्चिलेल्या विविध गुणांना, काव्य तत्त्वांना केंद्रस्थानी ठेवूनच साहित्यिकाकडून निर्माण झालेले असते. असा व्यापक सूचितार्थ सुद्धा वि. ना. ढवळे यांच्या व्याख्येतून व्यक्त होत राहतो.


पौर्वात्य, पाश्चात्त्य आणि आधुनिक साहित्य तज्ज्ञांनी साहित्याच्या वेगवेगळ्या व्याख्यांद्वारे साहित्याचे स्वरूप बऱ्याच अंशी आकलन सुलभ केलेले आहे; त्या आधारेच साहित्याच्या संदर्भात पुढील महत्त्वपूर्ण विवेचन करता येते.

## १.४ ललित व ललितेतर साहित्य

ललित आणि ललितेतर साहित्य म्हणजे काय ? याचे थोडक्यात विवेचन आपण पाहिले आहे. आधुनिक मराठी साहित्य अभ्यासकांनी या दोहोंचे वर्गीकरण अतिशय शास्त्रीयदृष्ट्या केलेले. त्यातून ललित व ललितेतर साहित्यातील भेदही दिसून येईल. खालील आकृतीच्या आधारे हे वर्गीकरण पहा –



Scanned with OKEN Scanner




यावरून आपणास ललित साहित्याच्या विविध प्रवाह आणि प्रकारांचा व्यापक पट लक्षात येतो. ललित साहित्य व ललितेतर साहित्य व्यक्तिनिर्मित असले तरी, ललित साहित्य हे व्यक्तिनिष्ठ तर ललितेतर साहित्य वस्तुनिष्ठ असते, तसेच समूहनिर्मिती साहित्यामध्ये लोककला आणि लोकवाङ्मयाचा आंतरभाव होतो. यामुळे साहित्याचे परिक्षेत्र खूप व्यापक असल्याचे स्पष्ट होते. म्हणून आपण केवळ ललित साहित्याच्या स्वरूपाचा शोध घेण्याचा प्रयत्न करणार आहोत.

## १.५ ललित साहित्यातून व्यक्त होणाऱ्या अनुभवांचे विशेष –

ललित साहित्यातून कवी-लेखकाचे व्यक्तिगत अनुभव प्रतिभेच्या मूशीतून कल्पना व भावनात्मकतेची तसेच विचारांची जोड मिळून व्यक्त झालेले असतात. साहित्यिकाला जाणवलेले सत्य साहित्यात सौंदर्यरूप घेऊन प्रकटते. म्हणून साहित्यातील सत्य केवळ बुद्धिनिष्ठ न राहता अनुभवण्याचा विषय बनलेले असते. ययाति, क्रौंचवध, मृत्युंजय, हिंदोळ्यावर, बळी, टारफुला, रणांगण, स्वामी, पड रे पाण्या, रथचक्र, नटसम्राट, अश्रूंची झाली फुले, पानिपत, स्वामी, बारी, बारोमास यासारख्या साहित्यकृतींचा आस्वाद घेताना एकेका सौंदर्यासक्त मनाने घेतलेल्या अनुभवाचा अनुभव आपण घेत असतो. त्यामुळेच तो कलानुभव बनतो. या अनुभवांचे काही महत्त्वाची वैशिष्ट्ये समजून घेणे आवश्यक आहे.

### १.५.१ संवेदनात्मकता

साहित्यातील अनुभव रस, रूप, गंध व नाद या पंच संवेदनांद्वारे रसिकाच्या चित्तापर्यंत पोचत असतात. त्यासाठी कवी-लेखकाची संवेदनक्षमता तरल, तीव्र असावी लागते. श्रेष्ठ साहित्यकृतींमधून आपणास त्याचा

प्रत्यय उत्कटतेने येतो. उदा. नारायण सुर्व्यांनी महानगरातील कामगार वर्गाचे जीवनवास्तव, त्यांचा संघर्ष, परवड, शोषण, लढाऊ बाणा इत्यादींना काव्यविषय बनविले. प्रत्यक्षात भेटलेली भणंग माणसे, त्यांचे जगणे, त्यांच्याशी कधी-कधी झालेले संवाद, त्यांच्यातील माणुसकीचा साक्षात्कार अशा अनेक घटना-प्रसंग सुर्व्यांनी प्रभावी आणि परिणामकारक शैलीत कवितेतून आविष्कृत केल्या आहेत. त्यांच्या 'शीगवाला' या कवितेतील मुस्लिम चाचा दंगलीत काशीबाईला वाचविताना आपला स्वतःचा पाय गमावून बसला आहे. तो अनुभव कवीला सांगताना चाचा म्हणतो,

''तो बेटे - आता आदमी झाला सस्ता - बकरा म्हाग झाला
जिंदगी मध्ये पोरा, पुरा अंधेर झाला
आनि सब्दाला
जगवेल असा कोन हाये दिलवाला
सबको पैसेने खा डाला.''

याप्रमाणे कवीने अत्यंत संवेदनशील मनाने हा अनुभव मांडलेला असल्यामुळे तो रसिकांच्याही संवेदनशीलतेला सजग बनवितो. म्हणून 'साहित्यातील संवेदनात्मकता' हा अनुभवाचा महत्त्वाचा विशेष असतो.

### १.५.२ भावनात्मकता

साहित्यात 'भावना' दर्शनाला अनन्यसाधारण महत्त्व असल्याचे पौर्वात्त्यांपासून ते अर्वाचीन साहित्य-तज्ज्ञांनी सांगितलेले आहे. साहित्यात भावनांची चित्रे जितकी जिवंत, उत्कट तितकी ती प्रत्ययकारी असतात. साहित्यिक आपल्या जीवनानुभवांना भावनात्मकतेची जोड देऊन त्याचा साहित्यातून आविष्कार करीत असतो. तो आपल्या अनुभवांच्या आधारे जीवनसत्याचा वेध घेतो, हा वेध तो भावनिक पातळीवरून घेतो. त्यामुळे त्याने अनुभवलेले सुख-दुःखात्मक क्षण, घटना-प्रसंग त्याला भेटलेल्या व्यक्ती, त्यांचे स्वभाव, राग-लोभ आणि त्यांच्या वृत्ती-प्रवृत्ती, जीवनसंघर्ष आदी अनेकविध बाबी साहित्यकृतीत सौंदर्यरूप घेऊन अवतरलेल्या असतात. म्हणूनच ते आस्वाद्य झालेले असते.

हरिभाऊ आपटेंच्या 'पण लक्षात कोण घेतो ?' ही कादंबरी वाचताना 'यमू'चे दुःख हेलावून सोडते. 'नटसम्राट', 'एकच प्याला' ही नाटके रसिक प्रेक्षकांना शोकाकुल बनवितात तर 'क्रांतीचा जयजयकार' सारखी कविता आजही देशभक्तीच्या भाववृत्ती उत्कट बनविते. त्यामुळेच भावनात्मकता हा ललित साहित्याचा खूप महत्त्वाचा अनुभव विशेष ठरतो.

'भावनात्मकता' या विशेषाबद्दल डॉ. लीला गोविलकर म्हणतात, ''साहित्यिकाच्या साहित्यातील भावनाविष्कार वाचकांना आपल्याबरोबर त्या विश्वात घेऊन जात असतो. लेखकाच्या मनाने घेतलेला जीवनानुभव साहित्यातून आविष्कृत होत असतो. पण या चित्रणात केवळ घटना वा व्यक्तिरेखा यांच्या वर्णनावर



Scanned with OKEN Scanner

लेखकाचा भर नसतो, तर त्याच्या मागे असलेल्या मानवी मनातील भावभावनांचे तांडव, लाघव, संमिश्रण, सखोलता व व्यापकता यांच्या चित्रणाकडे त्याचे लक्ष वेधलेले असते. वास्तव जगामध्ये पुष्कळदा या भावनांचे केवळ परिणाम जाणवत असतात. पण ते परिणाम घडविणाऱ्या/घडवून आणणाऱ्या भावनांचे चढ-उतार वा आरोह-अवरोह लेखकाच्या जाणिवेत असतात. त्याच्या साहित्यकृतीतून ते व्यक्त होत असतात. म्हणूनच घटना-प्रसंग-व्यक्तिरेखा यांच्यापेक्षा मनोविश्वातील रंग-तरंग साहित्याला वेगळेपणा देत असतात.''

साहित्यिकाकडे जितकी भावनात्मकता उत्कट असेल तितकी त्याची अनुभवाभिव्यक्ती रसपूर्ण व सौंदर्यपूर्ण असते, यात शंका नाही. ज्ञानेश्वरांनी याच अर्थाने म्हटले आहे.

''वाचे बरवे कवित्व । कवित्व बरवे रसिकत्व ।
रसिकत्वी परतत्त्व । स्पर्शु जैसा।।''

अ. वा. कुलकर्णी म्हणतात, ''ललितसाहित्याच्या संसाराचा आधारस्तंभ म्हणजे भावनाविलास होय.''

### १.५.३ वैचारिकता

माणूस हा विचार करणारा प्राणी असून जीवनात विचारांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. बुद्धिचा संबंध विचारांशी असतो. त्याआधारे माणूस जीवनाविषयीचे आडाखे बांधीत असतो; त्याप्रमाणे त्याची कृती-उक्तीही ठरत असते. जीवन काय आहे, कसे असावे इत्यादी प्रश्नांचा शोध घेण्याचा खटाटोप सामान्य माणसापेक्षाही अधिक गांभीर्याने आणि संवेदनशील वृत्तीने कवी-कलावंत करीत असतो. त्या चिंतनातून त्याला जाणवणारा महत अर्थ किंवा त्याविषयीचा अनुभव तो साहित्यकृतीतून मूर्त करीत असतो. साहित्यिकांच्या जीवनानुभवांना विशिष्ट विचारांचे अधिष्ठान असतेच. हे विचारच कित्येकदा कलात्मक रूप धारण करून साहित्यातून व्यक्त होतात. ललित साहित्यातून प्रकट होणारे वैचारिक अनुभव हे भावना, कल्पना, संवेदना यासह म्हणजे एकसमवायच्छेदेकरून साकार होत असतात; ते निखळपणे वेगळे काढून दाखविता येतीलच असे नाही. उदा. कवी अनिलांनी 'सारेच दीप कसे मंदावले आता' या कवितेतून स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या घोर निराशेचे चित्र समूर्त करून देशातील तरुणाईला जागृतीचे सूचक आवाहन केले आहे -

''सारी स्वरूपे कुरू झाली
हुरूप कशाचा नाही चित्ता
सारेच दीप कसे मंदावले आता !'

केशवसुतांच्या 'नवा शिपाई' या कवितेत समाजातील जातिव्यवस्था, अनिष्ट रूढी-परंपरा नाकारून सर्व जगामध्ये 'शांतीचे साम्राज्य' स्थापन करण्याचा विचार मांडलेला आहे. उदा -



Scanned with OKEN Scanner

> ''ब्राह्मण नाही, हिंदूही नाही, न मी एक पंथाचा''
> शांतीचे साम्राज्य स्थापू बघत काळ जो आहे
> प्रेषित त्याचा नव्या दमाचा शूर शिपाई आहे !''

कुसुमाग्रज, नारायण सुर्वे, विंदा करंदीकर, बहिणाबाई चौधरी, कवी बी, अनिल, अनिल धाकू कांबळी, विठ्ठल वाघ, नारायण सुमंत, इंद्रजित भालेराव अशा अनेक कवींच्या कवितांतून मूल्यात्मक विचार कलात्मकतेने व्यक्त झालेले आहेत. कथा, कादंबरी, नाटक, आत्मकथन आदी साहित्यातून तर साहित्यिक विचारांची अखंडपणे, कौशल्यपूर्ण मांडणी करीत आलेले आहेत. साहित्यातील विचारांचे महत्त्व स्पष्ट करताना अ. वा. कुलकर्णी म्हणतात -

''संवेदना, विचार आणि भावना या घटकांच्या आधिक्यावरच संवेदनानुभव, विचारानुभव आणि भावानुभव असे शब्द समीक्षेत वापरले जातात. साहित्यातून अवतीर्ण होणाऱ्या ज्या अनुभवास संवेदनेचे महत्त्व जास्त तो संवेदनानुभव म्हणून बालकवी, ग्रेस यांच्या काव्यात संवेदना अनुभव जाणवतो, असे म्हटले जाते. 'बी' कवीची कविता, वा. म. जोशी किंवा श्री. व्यं. केतकर यांची कादंबरी यात याच न्यायाने जाणवतो तो विचारानुभव.'' (साहित्यविचार - प्रा. अ. वा. कुलकर्णी, प्रतिभा प्रका. द्वितीयावृत्ती, १५ जुलै १९९७, पृ. क्र. २९)

यावरून विचारानुभव हाही ललित साहित्याचा एक भाग असल्याचे स्पष्ट होते.

### १.५.४. **सेंद्रियता** (Organic Unity)

ॲरिस्टॉटल या ग्रीक तत्त्ववेत्त्याने सर्वप्रथम साहित्यकृतीच्या सेंद्रियत्वाची कल्पना मांडली. सेंद्रियत्व म्हणजे एकसंधत्व होय. सौंदर्यानुभवाच्या संदर्भात हेगेल या सौंदर्यशास्त्रज्ञाने 'सेंद्रियता' या शब्दाची योजना केली. Organic Unity याचा अर्थ 'सुव्यवस्थित संघटना' होय. कोणतीही साहित्यकृती ही एकजिनसीच असते. मानवी शरीराच्या अवयवयांची नावे वेगवेगळी असली तरी संपूर्ण शरीरात एकच चैतन्य असते. त्याप्रमाणेच साहित्यकृती सुद्धा शब्द, वाक्य, आशय, शैली, पात्रे, भावना, विचार, कल्पना, संवेदना अशा विविध घटकांनी बनलेली एक सुव्यवस्थित, एकजिनसी संघटनाच असते - यालाच साहित्यकृतीचे सेंद्रियत्व म्हटले जाते. साहित्यिकाचे अनुभव याच प्रकारच्या समवायातून साहित्यरूप घेऊन अवतरत असतात. म्हणून रसिक मनावरही साहित्यकृतीचा एकात्म संस्कार होतो.

डॉ. लीला गोविलकर यांनी साहित्यातील सेंद्रियता स्पष्ट करताना कवितांची उदाहरणे दिली आहेत. कवितेच्या रचनेत बदल किंवा कडव्यांची मांडणी मागे-पुढे करून चालत नाही. तसे झाले तर कवीने मांडलेल्या अनुभवामध्ये बिघाड होतो. त्या लिहितात,

> ''मधु मागशी माझ्या सख्या परी । मधुघटची रिकामे पडती घरी ।''



Scanned with OKEN Scanner

या 'मधुघट' (तांबे) कवितेमधील 'तरुण-तरुणींची सलज्ज कुजबुज' हे मधले कडवे प्रारंभी किंवा कवितेच्या अखेरी घेतले तर कवितेतून व्यक्त होणारा अनुभव विस्कळीत होऊन जाईल.'' 'साहित्यविचार, संपा. डॉ. पुंडे, डॉ. तावरे, स्नेहवर्धन प्रका. पुणे, प्रथमावृत्ती, फेब्रुवारी १९९५, पृ. क्र. १८)

यावरून साहित्यकृती कोणतीही असली तरी तिच्यातून व्यक्त होणाऱ्या साहित्यिकाच्या अनुभवाचा 'सेंद्रियता' हा विशेष अनिवार्यच असतो.

### १.५.५ सूचकता

'सूचकता' हा ललित साहित्यातून व्यक्त होणाऱ्या अनुभवांचा अत्यंत महत्त्वाचा विशेष आहे. ललितेतर साहित्यात सूचकता मुळीच नसते. साहित्यिक आपल्या अनुभवांतून बरेच काही सुचवू पाहतात. पौर्वात्य काव्यशास्त्रज्ञ कुंतक याने 'वक्रोक्ती' हे काव्याचे लक्षण सांगितले आहे. त्याच्या मते, 'काव्यात सर्वत्र वक्रोक्तीचे अधिराज्य असते' येथे वक्रोक्ती म्हणजे सूचितार्थच होय; आनंदवर्धनानेही ध्वन्यार्थाला 'सूचितार्थ, प्रतियमान अर्थ' असे म्हटले आहे. साहित्यकृतीतून अनेक संदर्भांचे सूचन होत असते. त्यामुळेच त्यातून व्यक्त होणाऱ्या अनुभवांना कलात्मक सौंदर्य प्राप्त होते. साहित्यकृतीतील सूचकतेची काही उदारहणे पाहिली की तिचे स्वरूप स्पष्ट होऊ शकते.

उदा. बालकवींची 'औदुंबर' ही कविता सूचकतापूर्ण आहे. ''पाय टाकुनी जळात बसला असला औदुंबर'' कवितेच्या या शेवटच्या ओळीने रसिकांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण होतात. कवीने अनुभवलेला हा 'औदुंबर' नेमका कसला आहे, तो कोण आहे, तो कसा आहे, तो कशाकशाचे प्रतीक आहे ? - असे प्रश्न वा संदर्भ निर्माण करणारा अनुभवांचा विशेष म्हणजे सूचकता होय

साहित्यकृतींच्या शीर्षकांवरूनही त्यातील सूचकता जाणकार वाचकांच्या ध्यानी येते. उदा. 'मरण स्वस्त होत आहे', 'टिटवीचा फेरा', 'झोंबी', 'आपण माणसात जमा नाही', 'लग्नाची बेडी', 'लाल चिखल', 'रायगडला जेव्हा जाग येते', 'जिथे गवतास भाले फुटतात', 'रारंगढांग', 'वारणेचा वाघ' इत्यादी अनेक शीर्षकांमधून सूचकता व्यक्त होत असते. त्यामुळेच 'सामान्य माणूस एका मुखाने बोलत असतो तर कवी, साहित्यिक हजार मुखांनी बोलतात' असे म्हटले जाते. 'साहित्य हे सूचक असते व सूचक असते ते साहित्य असते' असे म्हटल्यासही ते योग्यच ठरते.

### १.५.६ विशिष्टता

प्रत्येक साहित्यकृती स्वतंत्र आणि विशिष्ट असते. कारण प्रत्येक साहित्यिकाची अनुभव घेण्याची आणि साहित्यातून ते मांडण्याची पद्धती, शैली भिन्न-भिन्न असते. उदा. 'तू मदरबोर्ड माझ्या संगणकाचा' ही अरुण काळे यांची कविता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना उद्देशून आहे तर कवी अजय कांडर यांची 'युगानुयुगे तूच' ही दीर्घ कवितासुद्धा डॉ. आंबेडकरांच्याच कार्यकर्तृत्त्वाचा वेध घेणारी आहे. दोनही कवींचा विषय एकच असूनही प्रत्येकाचा अनुभव येथे विशिष्ट स्वरूपात व्यक्त झाला. 'व्यक्ती तितक्या प्रकृती' या उक्तीप्रमाणे प्रत्येक साहित्यिक आणि त्याची साहित्यकृती विशिष्ट (तिच्यासारखी तीच) असते. म्हणूनच साहित्यकृतीचे बीज,



Scanned with OKEN Scanner

आशय, अभिव्यक्तीच्या पद्धती ह्या प्रत्येक साहित्यिकानुसार वेगवेगळ्या असतात. त्यामुळेच ललित साहित्यामध्ये सतत 'नवता' प्रत्ययास येत राहते.

### १.५.७ विश्वात्मकता

साहित्यनिर्मिती करण्यापूर्वी साहित्यिकाचे अनुभव त्याचे वैयक्तिक असतात. साहित्यातून ते व्यक्त होत असतानाच त्यातील वैयक्तिकता गळून पडत असते. एका अर्थाने साहित्यिकाची साहित्यकृती विशिष्ट राहूनही ती विश्वात्मक बनते. डॉ. उदय जाधव यांनी हे सोदाहरण स्पष्ट केले आहे.

''विठू माझा लेकुरवाळा । संगे लेकुरांचा मेळा ।।
निवृत्ती हा खांद्यावरी । सोपानाचा हात धरी।।
पुढे चाले ज्ञानेश्वर । मागे मुक्ताई सुंदर।।
गोरा कुंभार मांडियेवरी । चोखा जीवा बरोबरी।।
बंका कडियेवरी। नामा करांगुळी धरी।।
जनी म्हणे गोपाळा । करी भक्तांचा सोहळा।।''

विठ्ठलाचे प्रत्ययकारी चित्र या रचनेतून साकार झालेले आहे. हा खास जनाबाईचा अनुभव आहे, तो तिचा राहूनही सर्व वाचक श्रोत्यांचा बनून गेला आहे. म्हणजेच ललित साहित्यातून व्यक्त होणारे अनुभव हे विशिष्ट आणि विश्वात्मक असतात.'' शास्त्रातील प्रयोगानुभव साऱ्या जगाचे होतात, त्यांच्यावर निर्मात्यांचे ठसे नसतात. मात्र ललित साहित्यातच हे अनुभव विशिष्ट आणि विश्वात्मक स्वरूपात असतात.

## १.६ समारोप

पौर्वात्य, पाश्चात्त्य आणि आधुनिक साहित्य अभ्यासकांनी केलेल्या साहित्याच्या व्याख्या साहित्याच्या स्वरूपावर प्रकाश टाकणाऱ्या आहेत. साहित्याची एकच व्याख्या करता येत नाही; कारण साहित्य हे विविध घटकांच्या व्यामिश्र रसायनातून बनलेले असते, पण ते आनंद देणारे असते. त्या रचनेला 'ललित साहित्य म्हटलेले आहे. ललित साहित्य हा रसिकांच्या बुद्धिबरोबरच भाव-भावनांशी, जाणिवा-संवेदनांशीच नव्हे तर अनुभवविश्वाशीच तात्काळ भिडणारा, एकरूप होणारा कलाप्रकार असल्यामुळे ललित साहित्याचे मानवी जीवनामध्ये अनन्यसाधारण स्थान आहे. अशाच अर्थाने कवी नारायण सुर्वे म्हणतात,

''....आम्ही नसतो तर बिचारे हे चंद्र सूर्य तारे
फिके फिके झाले असते...
बापहो! तुमच्या व्यथांना शब्दांत अमर
कोणी केले असते !''

याची यथार्थता रसिक वाचकांना पडल्याशिवाय राहात नाही.

## १.७ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न व उत्तरे

### (अ) वस्तुनिष्ठ प्रश्न

१. ''शब्द आणि अर्थ यांचे सहितत्त्व म्हणजे साहित्य'' ही व्याख्या कोणी केली आहे ?

(अ) रुद्रट (ब) भामह (क) मम्मट (ड) वामन

२. 'काव्यप्रकाश' हा ग्रंथ कोणी लिहिला आहे ?

(अ) मम्मट (ब) जगन्नाथ (क) विश्वनाथ (ड) अभिनव गुप्त

३. शब्दप्रधान साहित्यामध्ये कोणत्या लेखनाचा समावेश करता येतो ?

(अ) इतिहास (ब) पुराण (क) रसप्रधान (ड) वेदादी

४. आनंदवर्धनाने ध्वनीला काव्याचा काय मानले आहे ?

(अ) जीव (ब) आत्मा (क) आरसा (ड) आशय

५. 'वाक्यं रसात्मकं काव्यम् ।' ही व्याख्या कोणाची आहे ?

(अ) कुंतल (ब) हेमचंद्र (क) विश्वनाथ (ड) भोज

६. वर्डस्वर्थने काव्यात कोणत्या घटकाला एकमेव महत्त्व दिले आहे ?

(अ) भावना (ब) कल्पना (क) विचार (ड) अनुभव

७. 'काव्य म्हणजे जीवनभाष्य' ही व्याख्या कोणाची आहे ?

(ब) कोर्टहॉप (ब) मॅथ्यू अर्नोल्ड (क) कार्लाईल (ड) केबल

८. विनोबा भावे यांनी साहित्य कशाला म्हटले आहे ?

(अ) अहिंसा (ब) संस्कृती (क) शासन (ड) शब्दार्थ

९. 'अनुभवाची अभिव्यक्ती म्हणजे साहित्य' ही व्याख्या कोणाची आहे ?

(अ) क. रं. शिरवाडकर (ब) अ. वा. कुलकर्णी

(क) गंगाधर गाडगीळ (ड) रा. ग. जाधव

१०. ललित साहित्यातील कोणत्या घटकाला आधुनिक साहित्य-समीक्षकांनी सर्वाधिक महत्त्व दिलेले आहे ?

(अ) सौंदर्य (ब) रस (क) कल्पना (ड) अनुभव

**उत्तरे :** १-ब, २-अ, ३-ड, ४-ब, ५-क,

६-अ, ७-ब, ८-अ, ९-क, १०-ड



Scanned with OKEN Scanner

### (ब) दीर्घोत्तरी प्रश्न

१. पौर्वात्य, पाश्चात्त्य आणि आधुनिक साहित्यशास्त्रज्ञांच्या व्याख्यांच्या आधारे साहित्याचे स्वरूप स्पष्ट करा.

२. ललित व ललितेतर साहित्यातील भेद सांगून ललित साहित्यातून व्यक्त होणाऱ्या अनुभवांचे विशेष स्पष्ट करा.

३. पौर्वात्त्य साहित्यशास्त्रज्ञांच्या काव्यविषयक व्याख्यांची सोदाहरण चर्चा करा.

४. पाश्चात्त्यांनी सांगितलेल्या साहित्यांच्या व्याख्यांचा निर्देश करून काव्यातील 'भावना व कल्पना' या घटकांचे महत्त्व स्पष्ट करा.

५. आधुनिक साहित्य अभ्यासकांनी सांगितलेल्या साहित्याच्या व्याख्यांचा सोदाहरण आढावा घ्या.

## १.८ संदर्भ ग्रंथ


१. अभिनव काव्यप्रकाश - रा. श्री. जोग, व्हीनस प्रकाशन, पुणे.

२. काव्यशास्त्र प्रदीप - डॉ. स. रा. गाडगीळ, विजया प्रकाशन, नांदेड.

३. विनोबांची साहित्य-दृष्टी - संपा. अ. ना. देशपांडे, परंधाम प्रकाशन, पवनार, आवृत्ती दुसरी १ फेब्रुवारी, १९७५.

४. साहित्यविचार - अ. वा. कुलकर्णी, प्रतिमा प्रकाशन, पुणे, आवृत्ती दुसरी, १५ जुलै, १९९७.

५. खडक आणि पाणी - गंगाधर गाडगीळ, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती १९६०.

६. साहित्यविचार - संपा. डॉ. पुंडे, डॉ. तावरे स्नेहल, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती फेब्रुवारी १९९५.

७. काव्यशास्त्र : आकलन आणि आस्वाद - डॉ. उदय जाधव, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, द्वितीय आवृत्ती, १ डिसेंबर, २०२०,




Scanned with OKEN Scanner